महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय , हिंगोली

GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL, HINGOLI DIST- HINGOLI Pin code-431513
Email-gmchingoli@gmail.com संपर्क-02456-299200

जा.क्र.शावैमवरुहिं/किरकोळ भांडार/दरपत्रक/ ३४ /२०२६ दिनांक :- 05 / 01 /२०२६

विषय - दरपत्रके सादर करणेबाबत...

संदर्भ :- १.या कार्यालयाची दि:०५-०१-२०२६ रोजीची मंजूर टिप्पणी

२. या कार्यालयाची दि.२६-१२-२०२५ रोजीची मध्यवर्ती खरेदी समितीची बैठकीतील इतिवृत्त.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, हिंगोली येथील प्रशासकीय कार्यालय, प्रशासकीय कार्यालयातील विविध कार्यासने, विविध वार्ड करिता प्रशासकिय कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीकोनातुन अंतर्गत लॅन केबल जोडणी तसेच वायफाय जोडणी व संबंधित बाबींची ११ महिण्याकरिता देखभाल व दुरुस्ती व परिरक्षण करण्याकरिता खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता दि.०१-१२-२०१६ रोजीचे खरेदीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या निर्देशानूसार स्थानिक बाजारपेठेतील मान्यताप्राप्त पुरवठाधारकांकडून सोबत जोडलेल्या रकान्यात नमूद केलेल्या साहित्यांचे दरपत्रके मागविण्यात येत आहेत. मान्यताप्राप्त पुरवठाधारकांनी दरपत्रके या कार्यालयास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून विहीत कालावधीमध्ये सादर करावीत.

| Sr. No. | Particualar | Qty. | Amount (without GST) |
|---|---|---|---|
| 1 | Fiber Optic Networking Switch 24 Port | 1 | |
| 2 | Patch Code | 1 | |
| 3 | WAN Router | 1 | |
| 4 | SFP To SFP Connectivity Module Fiber Optic End to End Connectivity | 1 | |
| 5 | Fiber Optic Cable | 1 Mtr | |
| 6 | Networking Rack 6U | 1 | |

**अटी व शर्ती -**

१. दरपत्रकात भरलेल्या दरांमध्ये खाडाखोड असल्यास सदरचे दर ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

२. दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक 15/ 01 / २०२६ हा राहील.

३. या कार्यालयास प्राप्त लिफाफाबंद दरपत्रके समितीसमोर उघडण्याचा दिनांक 16/01/२०२६ हा राहील.

४. एका पुरवठाधारकाचे फक्त एकच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

५. दरपत्रकासोबत दकान नोंदणी दाखला (शॉपॲक्ट नोंदणी प्रमाणपत्र), जीएसटी नोंदणी प्रमाणपत्रक आणि पॅनकार्ड यांच्या स्वप्रमाणित छायाप्रती सादर करणे आवश्यक राहील.

६. ज्या फर्मच्या नावाने दुकान नोंदणी आहे त्याच नावाने जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असले पाहिजे. त्याशिवाय सादर केलेली दरपत्रके ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच जीएसटी लागु नसल्यास त्याबाबतचे लेखी हमीपत्र या कार्यालया सादर करणे बंधनकारक राहील.

७. पुरवठाधारकांनी फर्मच्या लेटरहेड वर सही व शिक्क्यासहित प्रमाणित करुनच दरपत्रके सादर करणे बंधनकारक राहील.

८. दरपत्रकात दर सादर करताना सर्व करासहित दर स्पष्टपणे दर्शविण्यात यावे.

९. दरपत्रकात पुरवठाधारकाने स्वत:च्या कोणत्याही अटी व शर्ती नमूद करु नये. अटी व शर्ती नमूद केलेले दरपत्रके ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

१०. दरपत्रकावर दर्शविण्यात येणारी रक्कम अंकात आणि अक्षरात नमूद करावी.

११. मागविण्यात आलेले दरपत्रके स्वीकारणे, उघडणे किंवा कोणतीही पूर्वसुचना न देता निविदाप्रक्रिया रदद करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांनी राखून ठेवलेले आहेत. याबाबत आपली कोणतीही तक्रार ग्राहय धरल्या जाणार नाही.

१२. या संस्थेस १३-कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षांतर्गत आगामी काळात निधी उपलब्ध होण्याचे अधीन राहून दरपत्रके मागविण्या येत आहेत.

१३. साहित्यांचा पुरवठा करण्यासाठी ट्रान्सपोर्ट करिता अतिरिक्त मुल्य अदा करण्यात येणार नाही.

१४.संबंधित बाबींचा पुरवठा केल्यानंतर व प्रस्तापित केल्यानंतर ११ महिण्याच्या कालावधी करिता दुरुस्ती व देखभाल परिरक्षण स्वखर्चाने करावे लागेल त्याकरिता अतिरिक्त निधी या कार्यालयाकडुन उपलब्ध केला जाणार नाही.

सहपत्र - दरपत्रकाचे प्रारुप आराखडा

डॉ.श्रीचक्रधर मुंगल
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली

प्रत : १.नोटीस बोर्ड,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,हिंगोली.
२.सेवन टेक, आय.टी. सर्विसेस, जळगाव यांना देवून सूचित करण्यात येते की, सदरचे दरपत्रक मागविण्याबाबतचे पत्र या संस्थेच्या वेबसाईटवर उपरोक्त दिनांकानूसार प्रसिध्द करण्यात यावे.